पुढारी

# रवळनाथ परिवाराचा स्नेहमेळावा उत्साहात

## दिल्ली व गोवा कार्यक्षेत्र करण्याचे नियोजन

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

श्री रवळनाथ ही एक वित्तीय संस्था आहे. पण तिचे आर्थिक क्षेत्राबरोबर सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक या विविधांगी क्षेत्रातील कार्य पाहता ही संस्था समाजाला आदर्शवत असे आहे. निवारा चळवळीच्या माध्यमातून या संस्थेने राष्ट्राच्या उभारणीत दिलेले योगदान मोलाचे आहे, असे गौरवोद्गार परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी काढले. श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे संचालक, शाखा चेअरमन, शाखा सल्लागार व अधिकारी वर्ग यांच्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.



**गडहिंग्लज : येथील रवळनाथ स्नेहमेळाव्यामध्ये बोलताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. व्यासपीठावर एम. एल. चौगुले व पदाधिकारी.**

संचालिका रेखा पोतदार यांनी स्वागतपर कविता सादर केली. शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक प्राचार्य डॉ. बी. एम. हिर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. मुळे यांच्या हस्ते रवळनाथ प्रतिमापूजनाने मेळाव्याचे उद्घाटन झाले. संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले म्हणाले, रवळनाथच्या कर्जदारांना पंतप्रधान आवास योजना अनुदानाचा लाभासह दिल्ली व गोवा कार्यक्षेत्र आणि शाखा विस्तारासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्राचार्य डॉ. बी. एम. हिर्डेकर, आनंद मेणसे यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व संचालक शाखा अध्यक्ष, सल्लागार, शाखाधिकारी व अधिकारी यांचा सत्कार झाला. यावेळी सीईओ डी. के. मायदेव यांच्यासह विविध शाखांचे अध्यक्ष, संचालक, शाखाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Mar 30, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

पुण्य नगरी

# राष्ट्र उभारणीत रवळनाथचे योगदान मोलाचे : मुळे

गडहिंग्लज : प्रतिनिधी

रवळनाथ ही एक वित्तीय संस्था आहे; पण तिचे आर्थिक क्षेत्राबरोबर सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक या विविधांगी क्षेत्रातील कार्य पाहता ही संस्था समाजाला आदर्शवत अशी आहे. निवारा चळवळीच्या माध्यमातून या संस्थेने राष्ट्राच्या उभारणीत दिलेले योगदान मोलाचे आहे, असे गौरवोद्गार परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य ज्ञानेश्वर मुळे यांनी काढले.



गडहिंग्लज : रवळनाथच्या स्नेहमेळाव्यात बोलताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. उपस्थित एम. एल. चौगुले, बी. एम. हिर्डेकर, आनंद मेणसे यांच्यासह अन्य.

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे संचालक, शाखाध्यक्ष, शाखा सल्लागार व अधिकारी यांच्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक प्राचार्य डॉ. बी. एम. हिर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य हिर्डेकर, प्राचार्य आनंद मेणसे, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, डी. के. मायदेव, सुरेशा भालेराव, पुष्पा नेसरीकर, आर. बी. पाटील, विजय हरगुडे, माणिक घुमाई, प्रवीणसिंह शिलेदार, माधुरी शानभाग, सिद्धेश्वर डिसले यांनी मनोगत व्यक्त केले. सेवानिवृत्तीनिमित्त जयसिंगपूर शाखेचे शाखाधिकारी सुनील उत्तुरे यांचा सत्कार करण्यात आला. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

**Smart Kolhapur**
Page No.3 March 30, 2022

सकाळ

# रवळनाथची २५ वर्षांतील प्रगती नेत्रदीपक : डॉ. हिर्डेकर

**गडहिंग्लज, ता. २९ :** पंचवीस वर्षांत तीन हजार मध्यमवर्गीयांच्या घरकुलांची स्वप्नपूर्ती केलेल्या श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची २५ वर्षांतील प्रगती नेत्रदीपक आहे, असे गौरवोद्‌गार विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक प्राचार्य डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी काढले.

श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मुळे यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्‌घाटन झाले. डॉ. मुळे म्हणाले, 'नेतृत्व व व्यवस्थापनाच्या दिवाळखोरीमुळेच राज्यातील सहकार चळवळ बदनाम झाली आहे. परंतु, देदीप्यमान वारसा व परंपरा लाभलेल्या सहकारातूनच सामाजिक परिवर्तन शक्य आहे. त्यासाठी रवळनाथची कामगिरी दीपस्तंभाप्रमाणे आहे. चौगुले म्हणाले, 'रवळनाथच्या कर्जदारांना पंतप्रधान आवास योजना अनुदानाच्या लाभासह दिल्ली व गोवा कार्यक्षेत्र व शाखा विस्तारासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्याला लवकरच यश मिळेल.'

प्राचार्य आनंद मेणसे, सीईओ डी. के. मायदेव, सुरेखा भालेराव, पुष्पा नेसरीकर, आर. बी. पाटील, विजय हरगुडे, माणिक घुमाई, प्रा. प्रवीणसिंह शिलेदार, माधुरी शानभाग, सिद्धेश्वर डिसले यांची भाषणे झाली. निवृत्तीबद्दल जयसिंपूर शाखाधिकारी सुनील उत्तुरे यांचा सत्कार झाला.



कुडाळ : रवळनाथ परिवाराच्या स्नेहमेळाव्यात बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर. शेजारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे, एम. एल. चौगुले, व्ही. के. मायदेव, आनंद मेणसे आदी.

Kolhapur, Gadhinglaj-Today
30/03/2022 Page No. 3

तरुण भारत गुरुवार, ३१ मार्च २०२२

# रवळनाथ संस्थेची प्रगती कौतुकास्पद

## डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे प्रतिपादन : स्नेहमेळावा उत्साहात

प्रतिनिधी
गडहिंग्लज

गेल्या २५ वर्षात ३ हजार मध्यमवर्गीयांच्या घरकुलाचे स्वप्न साकारणाऱ्या रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची प्रगती कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी बोलताना केले.



गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटीच्या कार्यक्रमात बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर. यावेळी उपस्थित संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्यासह इतर मान्यवर.

रवळनाथ सोसायटीच्या संचालक, शाखा चेअरमन, शाखा सल्लागार, अधिकारी यांचा स्नेहमेळावा नुकताच पार पडला. यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे अध्यक्षस्थानी होते. सुरवातीस रवळनाथच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संचालक डॉ. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. संचालक रेखा पोतदार यांनी स्वागतपर गीत सादर केले. यावेळी डॉ. मुळे यांनी नेतृत्व आणि व्यवस्थापनाच्या दिवाळखोरीमुळेच राज्यात सहकार चळवळ बदनाम झाली. परंतु दैदिप्यमान वारसा आणि परंपरेतून सहकारातून सामाजिक परिवर्तन शक्य असल्याचे सांगितले. सेवानिवृत्तीबद्दल सुनिल उत्तुरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्राचार्य आनंद मेणसे, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, सीईओ डी. के. मायदेव, सुरेखा भालेराव, पुष्पा नेसरीकर, आर. बी. पाटील, विजय हरगुडे, प्रा. माणिक घुमाई, प्रा. प्रविणसिंह शिलेदार, प्राचार्या माधुरी शानभाग, प्राचार्य सिध्देश्वर डिसले यांनी मनोगते व्यक्त केली. आभार उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी मानले. डॉ. एच. व्ही. देशपांडे, महावीर चौगुले, डॉ. आर. एस. निळपणकर, महेश मजती, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, एस. एन. देसाई उपस्थित होते.